# भाग - १ बदली, नेमणुक, पदोन्नती

क्र:पोअय/कक्ष-१०/भरोसा सेल-नेमणूक/ 6768/२०२१
कार्यालय पोलीस अधीक्षक, यवतमाळ.
एल. आय. सी. चौक, ता. व जि. यवतमाळ.
पिन कोडः ४४५ ००१.
Email- sp.yavatmal@mahapolice.gov.in
दिनांक : 18 JUN 2021

## आदेश

**विषय :- "भरोसा सेल" यवतमाळ येथे पोलीस अधिकारी यांचे नेमणूकीबाबत..**

****

उपरोक्त विषयास अनुसरुन, सहायक पोलीस निरीक्षक/विजया दावलू पंधरे हया सध्या पोस्टे.वणी येथे नेमणूकीस आहेत.

सहायक पोलीस निरीक्षक/विजया दावलू पंधरे, पोस्टे.वणी यांची पोलीस अधीक्षक कार्यालय, यवतमाळ येथील **"भरोसा सेल"** येथे प्रभारी अधिकारी म्हणून तात्पुरत्या स्वरुपात पुढील आदेशापर्यंत नेमणूक करण्यात येत आहे.

ठाणेदार, पोस्टे.वणी यांनी सपोनि/विजया पंधरे यांना त्वरित नेमणूकीचे ठिकाणी कार्यमुक्त करावे व पूर्तता अहवाल या कार्यालयास सादर करावा.

18/06/21

**( डॉ.दिलीप पाटील-भुजबळ)**
**पोलीस अधीक्षक, यवतमाळ.**

प्रति,

सहायक पोलीस निरीक्षक/विजया दावलू पंधरे, पोस्टे.वणी

प्रत माहितीस्तव सविनय सादर :- पोलीस उप महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र, अमरावती.

**प्रतिलीपी:**-अ.पो.अधीक्षक/पोउपअधी(मुख्या)/ठाणेदार, पोस्टे.वणी/महिला व बाल अत्याचार प्रतिबंधक कक्ष/ लघुलेखक/कक्ष-१७-वेतन लिपीक-२ /कक्ष-१४-राजपत्र लिपिक.

क्र:पोअय/कक्ष-१०/पोनि-माळवे/हजर/ 6630 /२०२१
कार्यालय पोलीस अधीक्षक, यवतमाळ.
एल. आय. सी. चौक, ता. व जि. यवतमाळ.
पिन कोड: ४४५ ००१.
Email- sp.yavatmal@mahapolice.gov.in
दिनांक : 16 JUN 2021

## आदेश

**संदर्भ :-** पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे आदेश क्र.पोमसं/३/१०/०६/अतिरिक्त पदे-पोनि/१२७/२०२१, दि.१०/०६/२०२१

**विषय :-** बदलीवर हजर करुन घेणेबाबत/पोलीस निरीक्षक, अमोल माळवे

****

उपरोक्त संदर्भांकित आदेशानुसार पोलीस निरीक्षक/अमोल महादेवराव माळवे यांची कोल्हापूर जिल्हा ते यवतमाळ जिल्हा येथे त्यांचे विनंतीवरुन बदली करण्यातआलेली आहे.

पोलीस अधीक्षक, कोल्हापूर यांनी त्यांना दि.१२/०६/२०२१ म.नं.रोजी कार्यमुक्त केल्याने पोलीस निरीक्षक/अमोल माळवे हे यवतमाळ जिल्हा येथे दि.१६/०६/२०२१ म.नं.रोजी कर्तव्यावर हजर झाले आहेत.

पोलीस निरीक्षक/अमोल महादेवराव माळवे यांना यवतमाळ जिल्हा येथे हजर करुन घेण्यात येत असून त्यांची नेमणूक **आर्थिक गुन्हे शाखा (E.O.W), यवतमाळ** येथे करण्यात येत आहे.

१६।०६।२१

**( डॉ.दिलीप पाटील-भुजबळ)**
**पोलीस अधीक्षक, यवतमाळ.**

प्रति,

पोलीस निरीक्षक/अमोल महादेवराव माळवे

प्रत माहितीस्तव सविनय सादर :- पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई. (लक्षवेध-का.क्र.३)
पोलीस उप महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र, अमरावती.
प्रत माहिकरिता सस्नेह अग्रेषित :-पोलीस अधीक्षक, कोल्हापूर

**प्रतिलीपी:**-अ.पो.अधीक्षक/पोउपअधी(मुख्या)/आर्थिक गुन्हे शाखा/पो.नियंत्रण कक्ष/राखीव पोलीस निरीक्षक पो.मु/ लघुलेखक / कक्ष- १७-वेतन लिपीक-२./कक्ष-३-इमारत लिपिक/कक्ष-४-पोलीस कल्याण शाखा/कक्ष-१२-विभागीय चौकशी/कक्ष-१४-राजपत्र लिपिक.

क्र:पोअय/कक्ष-१०/पोउपनि-अमोल राठोड/कार्यमुक्त/ 6632 /२०२१
कार्यालय पोलीस अधीक्षक, यवतमाळ.
एल. आय. सी. चौक, ता. व जि. यवतमाळ.
पिन कोड: ४४५ ००१.
Email- sp.yavatmal@mahapolice.gov.in
दिनांक : 16 JUN 2021

---

आदेश

**संदर्भ :-** १.पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे आदेश क्र.पोमसं/५/१०/पोउपनि-अतिरिक्त पदे/५३/२०२१, दि.१०/०६/२०२१

२. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे आदेश क्र.पोमसं/५/१०/पोउपनि-मविस्पप-२०१६/सत्र-११५/१६०/२०१६, दि.२९/१०/२०२०

**विषय :** अमरावती परिक्षेत्र येथे बदलीचे ठिकाणी कार्यमुक्त करणेबाबत.

****

उपरोक्त विषय व संदर्भान्वये पोलीस उप निरीक्षक/अमोल जयसिंग राठोड, नियंत्रण कक्ष, यवतमाळ यांची अमरावती परिक्षेत्र ते गडचिरोली परिक्षेत्र येथे करण्यात आलेल्या बदलीचे आदेशामध्ये अंशतः बदल करुन आता त्यांची बदली अमरावती परिक्षेत्र येथे करण्यात आलेली आहे.

त्यामुळे पोउपनि/अमोल जयसिंग राठोड, नियंत्रण कक्ष, यवतमाळ यांना अमरावती परिक्षेत्र येथे हजर होणेकरिता यवतमाळ जिल्हयाचे आस्थापनेवरुन **दि.१६/०६/२०२१ रोजी म.नंतर** कार्यमुक्त करण्यांत येत आहे.

त्यांनी त्यांचेकडील शस्त्र व दारुगोळा, ओळखपत्र पोलीस मुख्यालय येथे जमा करावे व त्यांचेकडे शासकीय निवासस्थान असल्यास त्यांनी ते विहित मुदतीत रिक्त करावे. तसेच त्यांनी त्यांचे पदाचा कार्यभार, तपासावर प्रलंबित असलेले गुन्हे, आकस्मिक मृत्यु प्रकरणे, चौकशीवर प्रलंबित तक्रार अर्ज व इतर महत्वाचे कागदपत्र इत्यादी पोस्टे./शाखेमधील मधील दुय्यम अधिकारी यांचेकडे हस्तांतरित करुन बदलीचे ठिकाणी रवाना व्हावे.

१६/०६/२१

**( डॉ.दिलीप पाटील-भुजबळ)**
**पोलीस अधीक्षक, यवतमाळ.**

प्रति,

पोउपनि/अमोल जयसिंग राठोड, नियंत्रण कक्ष, यवतमाळ.

प्रत माहितीस्तव सविनय सादर :-

पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई. (लक्षवेध-का.क्र.५)
विशेष पोलीस महानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र, गडचिरोली
पोलीस उप महानिरीक्षक,अमरावती परिक्षेत्र,अमरावती.

**प्रतिलीपी:**-अ.पो.अधीक्षक/पोउपअधी(मुख्या)/पो.नियंजण कक्ष/ राखीव पोलीस निरीक्षक, पो.मु/लघुलेखक/ कक्ष-३-इमारत लिपिक/कक्ष-४-पोलीस कल्याण शाखा/कक्ष-१२-विभागीय चौकशी/कक्ष-१४-राजपत्र लिपिक/कक्ष- १७-वेतन लिपीक-२.

क्र:पोअय/कक्ष-१०/सपोनि ते पोनि पदो./हजर/ 6633 /२०२१
कार्यालय पोलीस अधीक्षक, यवतमाळ.
एल. आय. सी. चौक, ता. व जि. यवतमाळ.
पिन कोडः ४४५ ००१.
Email- sp.yavatmal@mahapolice.gov.in
दिनांक : 16 JUN 2021

# आदेश

**संदर्भ :-** १. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे आदेश क्र.पोमसं/३/११/६/API to PI Excess/ २३/०२/२०२१/१०५/२०२१, दि.१०/०६/२०२१

२.पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे आदेश क्र.पोमसं/३/११/६/निवडसूची-२०१९-२०/४९५/२०१९, दि.२३/०२/२०२१

**विषय :-** सहायक पोलीस निरीक्षक ते पोलीस निरीक्षक पदी पदोन्नतीवर हजर करुन घेणेबाबत.

****

उपरोक्त संदर्भांकित आदेशानुसार (संदर्भ क्र.२ प्रमाणे) सपोनि/अजित बाळकृष्ण जाधव यांची पोलीस निरीक्षक पदी पदोन्नतीवर पुणे ग्रामिण येथून अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, अमरावती येथे नेमणूक करण्यात आली होती.

आता संदर्भ क्रमांक १ प्रमाणे नमूद आदेशान्वये, सपोनि/अजित बाळकृष्ण जाधव यांची पोलीस निरीक्षक पदोन्नतीवर पुणे ग्रामिण येथून अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, अमरावती येथे करण्यात आलेल्या नेमणूकीचे आदेशामध्ये अंशतः बदल करुन त्यांची पोलीस निरीक्षक पदी नेमणूक यवतमाळ जिल्हा येथे करण्यात आलेली आहे.

त्यानुसार सपोनि/अजित बाळकृष्ण जाधव हे पोलीस निरीक्षक पदी पदोन्नतीवर यवतमाळ जिल्हा येथे दि.१२/०६/२०२१ म.नं.रोजी कर्तव्यावर हजर झाले आहेत.

सपोनि/अजित बाळकृष्ण जाधव यांना यवतमाळ जिल्हा येथे पोलीस निरीक्षक पदी पदोन्नतीवर कर्तव्यावर हजर करुन घेण्यात येत असून त्यांची नेमणूक **सायबर सेल, यवतमाळ** येथे करण्यात येत आहे.

१६/०६/२१

**( डॉ.दिलीप पाटील-भुजबळ)**
**पोलीस अधीक्षक, यवतमाळ.**

प्रति,

पोलीस निरीक्षक/अजित बाळकृष्ण जाधव.

प्रत माहितीस्तव सविनय सादर :- पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई. (लक्षवेध-का.क्र.३)
पोलीस उप महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र, अमरावती.

प्रत माहिकरिता सस्नेह अग्रेषित :-पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामिण
उपायुक्त तथा उपाध्यक्ष, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, अमरावती.

**प्रतिलीपी:**-अ.पो.अधीक्षक/पोउपअधी(मुख्या)/सायबर सेल/पो.नियंत्रण कक्ष/राखीव पोलीस निरीक्षक पो.मु/ लघुलेखक / कक्ष- १७-वेतन लिपीक-२./कक्ष-३-इमारत लिपिक/कक्ष-४-पोलीस कल्याण शाखा/कक्ष-१२-विभागीय चौकशी/कक्ष-१४-राजपत्र लिपिक.

# भाग - २ रजा/बिनपगारी रजा

क्रमांक :पोअय/कक्ष-९(३)/र.प्र.स./6594/२०२०
पोलीस अधिक्षक कार्यालय, यवतमाळ
एल. आय. सी. चौक , ता. व जि. यवतमाळ
पिन कोडः ४४५ ००१.
Email- sp.yavatmal@mahapolice.gov.in
दिनांक : 16 JUN 2021

आदेश :-

खालील नमुद पोलीस कर्मचारी यांनी त्यांच्या कुटुंबातिल सदस्यासह त्यांचे नावासमोर दर्शविल्याप्रमाणे गटवर्ष २०२१-२०२४ करीता स्वतः व कुटुंबासह स्वतःचे मुख्यालय ते घोषित ठिकाणी शासन निर्णय वित्त विभाग क्र. रप्रस/१९९४/१८४/सेवा-५,दि.२८.०३.१९९५ व शासन निर्णय वित्त विभाग क्र. संकिर्ण-१०००/प्रक्र/७०/सेवा-५ दिनांक १०.०६.२०१५ तरतुदी नुसार रजा प्रवास सवलत मंजुर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | पदनाम | ब.नं. | नाव | नेमणुक | कोठुन | कोठे | कुटुंबातिल व्यक्तींची संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | पोशि | १०६६ | दिपक शिंदे | पो मु | यवतमाळ | गणपतीपुळे | ३ |
| २. | पोना | १४६१ | विनोद राठोड | यवत ग्रा. | यवतमाळ | गणपतीपुळे | ५ |
| ३. | सपोउपनि | १४७७ | शिवहर जवने | जिविशा | यवतमाळ | गणपतीपुळे | ४ |
| ४. | पोहवा | १३४२ | प्रशांत खरात | नेर | यवतमाळ | सावंतवाडी | ४ |
| ५. | मपोशि | १२९७ | माला वानखडे | यवत श. | यवतमाळ | गणपतीपुळे | ३ |
| ६. | मपोना | २०९३ | रोहिणी पाटिल | नक्षल सेल | यवतमाळ | गणपतीपुळे | ५ |
| ७. | मपोशि | २३३२ | ममता ठाकरे | जिविशा | यवतमाळ | गणपतीपुळे | ३ |
| ८. | मपोना | १२११ | आशा नाईक | यवत ग्रा. | यवतमाळ | सावंतवाडी | ३ |
| ९. | मपोशि | २६२४ | पुजा गुरव | यवत ग्रा. | यवतमाळ | सावंतवाडी | ३ |
| १०. | मपोना | २१२२ | जयश्री चव्हाण | यवत ग्रा. | यवतमाळ | सावंतवाडी | २ |
| ११. | पोना | ४६८ | नितीन जाधव | यवत ग्रा. | यवतमाळ | सावंतवाडी | ६ |
| १२. | पोना | ३८२ | संजय राठोड | यवत ग्रा. | यवतमाळ | सावंतवाडी | ४ |
| १३. | पोहवा | १७८१ | प्रभाकर चौरे | पो नि कक्ष | यवतमाळ | सावंतवाडी | ४ |
| १४. | पोहवा | ६३४ | ज्ञानेश्वर मंदुरकर | पो मु. | यवतमाळ | सावंतवाडी | ४ |
| १५. | सपोउपनि | ३६ | राजेंद्र जाधव | मोपवि | यवतमाळ | गणपतीपुळे | ५ |
| १६. | पोना | २९ | प्रशांत महाजन | पो मु | यवतमाळ | गणपतीपुळे | ४ |
| १७ | मपोना | ११६६ | सुशिला गायकवाड | यवत ग्रा. | यवतमाळ | सावंतवाडी | ४ |
| १८. | पोना | ६९२ | गजानन खांदवे | यवत ग्रा. | यवतमाळ | सावंतवाडी | ६ |

सदर रजा प्रवास सवलतीमध्ये उपरोक्त नमुद शासन परीपत्रक संकिर्ण-१०००/प्रक्र/७०/सेवा-५ दिनांक १०.०२.२००१ अन्वये हयात अपत्ते व पत्नी यांचा समावेश राहिल. रजा प्रवास सवलत उपभोगल्या नंतर देयक सादर करतांना सार्वजनिक वाहन/ रेल्वेची व एस. टी. ची तिकीटे पुराव्यादाखल सादर करावी. प्रवास जवळच्या मार्गाने व किफायतशीर दराने करण्यात यावा. तसेच रजा प्रवास सवलत उपभोगण्यासाठी पोलीस कर्मचा-यास कोणत्या दिनांकास व कोणत्या रजेवर सोडले आहे याबाबत या कार्यालयास कळविण्यात यावे. रज प्रवास देयकाचा खर्च २०५५ पोलीस दल वेतन-१ या लेखाशिर्षाखाली मंजुर असलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

( माधुरी बाविस्कर )
पोलीस उप अधीक्षक (मुख्या.)
पोलीस अधीक्षक यवतमाळ यांचे करिता

प्रति,

संबंधित कर्मचारी पो.मुख्यालय/यवत ग्रा./ जिविशा/ नेर/ यवत श./ नक्षल सेल/पो. नि. कक्ष/ मोपवि.

प्रत :- जिल्हा पोलीस राजपत्र लिपिक यांना योग्य कार्यवाहीस.

२/- पोलीस कल्याण निधी लिपिक :- सदर कर्मचारी यांना प्रत्येकी १०००/- अग्रीम पो.क.नि. मधुन देण्यात यावे.

महाराष्ट्र पोलीस
सदरक्षणाय खलनिग्रहणाय

क्रमांक :पोअय/कक्ष-९(३)/विशेष रजा/ 6593 /२०२१
पोलीस अधिक्षक कार्यालय, यवतमाळ
एल. आय. सी. चौक , ता. व जि. यवतमाळ
पिन कोड: ४४५ ००१.
Email- sp.yavatmal@mahapolice.gov.in
दिनांक : 16 JUN 2021

---

आदेश :-

मपोना/ १११८ मंजुळा पवार, नेमणुक पो.स्टे. लोहारा यांना दि. ३०.०४.२०२१ रोजी कुत्रा चावल्याने विशेष रजा मिळणेबाबत विनंती केली आहे. सदर विशेष रजा देण्याबाबतची तरतुद मुंबई वित्तीय नियम १९५९ मधील परिशिष्ट-१५ मध्ये तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम,१९८१ मधील नियम ९ (१४) तील (आय) मध्येही नमुद करण्यात आलेली आहे.

वित्त विभाग शासन निर्णय दिनांक ११.०९.२०१७ अन्वये मुंबई वित्तीय नियम १९५९ मधील परिशिष्ट - १५ वगळण्यात आले असल्याने श्वानदंशानंतर उपचार घेणा-या कर्मचा-याला विशेष रजा मंजुर करता येणार नाही. सदर आदेशाद्वारे आपली विनंती अमान्य करण्यात येत आहे.

( मा. पो.अ. यांचे मान्यतेने )

( माधुरी बाविस्कर )
पोलीस उप अधीक्षक (मुख्या.)
पोलीस अधीक्षक यवतमाळ यांचे करिता

प्रति,

मपोना/ १११८ मंजुळा पवार, नेमणुक पो.स्टे. लोहारा

मार्फत :- पोलीस निरीक्षक/ प्रभारी अधिकारी पो.स्टे. लोहारा.

प्रत :- जिल्हा पोलीस राजपत्र लिपिक यांना योग्य कार्यवाहीस.

# भाग - ३ वेतन /भत्ते व रोखीकरण

क्रमांकः पोअय/कक्ष-१२/पोहवा-११५१ अभिजीत सांगळे/वेतन बंद/ 6716 /२०२१
कार्यालय पोलीस अधीक्षक, यवतमाळ.
एल. आय. सी. चौक, ता. व जि. यवतमाळ
पिन कोड :- ४४५ ००१.
Email- sp.yavatmal@mahapolice.gov.in
दिनांक :- 17 JUN 2021

## आदेश

संदर्भ :-१) या कार्यालयाचे आदेश क्र. पोअय/कक्ष-१२/पोहवा-११५१ सांगळे/सलग्नता रदद/३३८४/२०२१, दिनांक २७/०४/२०२१.

२) पोलीस मुख्यालय यवतमाळ यांचे पत्र क्र. पोमुय/पोहवा-११५१/सलग्न रदद/१२९१/२०२१, दिनांक ०३/०६/२०२१.

विषय :- पोहवा/११५१ अभिजीत सांगळे, नेमणुक पो.मुख्या. यवतमाळ यांचे गैरहजर अहवालाबाबत..

---ooo---

पोहवा/११५१ अभिजीत सांगळे, नेमणुक पोलीस मुख्यालय यवतमाळ सलग्न वाहतुक शाखा पुसद यांचेविरुध्द पो.स्टे. पुसद शहर येथे अप.क्र. ३३०९/२०१३ कलम ७, १३ (१) (ड) सहकलम १३(२) भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ अन्वये दिनांक १७/०९/२०१३ रोजी गुन्हा दाखल झाल्याप्रकरणी त्यांचेविरुध्द विभागीय चौकशी आदेशीत केल्यामुळे त्यांना संदर्भ क्र. ०१ चे आदेशान्वये त्यांची सलग्नता रदद करुन मुळ नेमणुकीचे ठिकाणी हजर होणेबाबत आदेशीत करण्यात आले होते. त्यानुसार त्यांना दिनांक ०७/०५/२०२१ रोजी वाहतुक शाखा उमरखेड येथुन कार्यमुक्त करण्यात आले असतांना सुध्दा पोलीस मुख्यालय यवतमाळ येथे हजर झाले नाही यावरुन ते विनापरवानगी स्वअधिकारात कर्तव्यामध्ये अनधिकृतपणे गैरहजर राहुन अत्यंत हलगर्जीपणा व वरिष्ठांची अवमानना करणारे वर्तन करुन कर्तव्यात परायणता ठेवल्याचे दिसुन येत नाही.

**करीता पोहवा/११५१ अभिजीत सांगळे, नेमणुक पोलीस मुख्यालय यवतमाळ सलग्न वाहतुक शाखा पुसद यांचे माहे जुलै/२०२१ पासुनचे वेतन No Work No Pay या तत्वानुसार तात्काळ बंद करण्यात येत आहे.**

१७/०६/२१

(डॉ.दिलीप पाटील-भुजबळ)
पोलीस अधीक्षक, यवतमाळ.

प्रति,

वेतन लिपीक-०१ (कक्ष-१८)
पोलीस अधीक्षक कार्यालय यवतमाळ.

प्रत :- पोहवा/११५१ अभिजीत सांगळे, नेमणुक पोलीस मुख्यालय यवतमाळ.

प्रत :- रा.पो.नि. पो.मुख्या. यवतमाळ/वाहतुक शाखा उमरखेड/कक्ष-९/कक्ष-९-३/ कक्ष-१४ यांना माहिती व योग्य कार्यवाहीस.

क्रमांकः पोअय/कक्ष-१२/पोहवा-११५१ अभिजीत सांगळे/विनावेतन/ 6717 /२०२१
कार्यालय पोलीस अधीक्षक, यवतमाळ.
एल. आय. सी. चौक, ता. व जि. यवतमाळ
पिन कोड :- ४४५ ००१.
Email- sp.yavatmal@mahapolice.gov.in
दिनांक :- 17 JUN 2021

## आदेश

**संदर्भ** :-१) या कार्यालयाचे आदेश क्र. पोअय/कक्ष-१२/पोहवा-११५१ सांगळे/सलग्नता रदद/३३८४/२०२१, दिनांक २७/०४/२०२१.
२) पोलीस मुख्यालय यवतमाळ यांचे पत्र क्र. पोमुय/पोहवा-११५१/सलग्न रदद/१२९१/२०२१, दिनांक ०३/०६/२०२१.

**विषय** :- पोहवा/११५१ अभिजीत सांगळे, नेमणुक पो.मुख्या. यवतमाळ यांचे गैरहजेरीबाबत.

---ooo---

खालील नमुद पोलीस अंमलदार हे पोलीस मुख्यालय यवतमाळ येथे नेमणुकीस असुन वाहतुक शाखा पुसद येथे सलग्न आहे. यांचेविरुध्द पो.स्टे. पुसद शहर येथे अप.क्र. ३३०९/२०१३ कलम ७, १३ (१) (ड) सहकलम १३(२) भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ अन्वये दिनांक १७/०९/२०१३ रोजी गुन्हा दाखल झाल्याप्रकरणी त्यांचेविरुध्द विभागीय चौकशी आदेशीत केल्यामुळे त्यांना संदर्भ क्र. ०१ चे आदेशान्वये त्यांची सलग्नता रदद करुन मुळ नेमणुकीचे ठिकाणी हजर होणेबाबत आदेशीत करण्यात आले होते. त्यानुसार त्यांना दिनांक ०७/०५/२०२१ रोजी वाहतुक शाखा उमरखेड येथुन कार्यमुक्त करण्यात आले असतांना सुध्दा पोलीस मुख्यालय यवतमाळ येथे हजर झाले नाही यावरुन ते विनापरवानगी स्वअधिकारात कर्तव्यामध्ये अनधिकृतपणे गैरहजर राहुन अत्यंत हलगर्जीपणा व वरिष्ठांची अवमानना करणारे वर्तन करुन कर्तव्यात परायणता ठेवल्याचे दिसुन येत नाही.

| अ.क्र. | पोलीस अंमलदार यांचे नाव व पदनाम | नेमणुक | गैरहजर कालावधी |
|---|---|---|---|
| १ | पोहवा/११५१ अभिजीत सांगळे, | पोलीस मुख्यालय यवतमाळ सलग्न वाहतुक शाखा पुसद | दिनांक ०७/०५/२०२१ ते दिनांक ०७/०६/२०२१ एकुण ३२ दिवस कर्तव्यावरुन अनधिकृत गैरहजर |

**करीता पोहवा/११५१ अभिजीत सांगळे, नेमणुक पोलीस मुख्यालय यवतमाळ सलग्न वाहतुक शाखा पुसद यांचा कर्तव्यातील गैरहजेरी एकुण ३२ दिवसाचा कालावधी हा No Work No Pay या तत्वानुसार विनावेतन करण्यात येत आहे.**

१७/०६/२१

(डॉ.दिलीप पाटील-भुजबळ)
पोलीस अधीक्षक, यवतमाळ.

प्रति,

**पोहवा/११५१ अभिजीत सांगळे,** नेमणुक पोलीस मुख्यालय यवतमाळ.

**मार्फत** :- राखीव पोलीस निरीक्षक, पोलीस मुख्यालय यवतमाळ.

**प्रत** :- कक्ष-९/कक्ष-९-३/कक्ष-१८/कक्ष-१४ यांना यांना माहिती व योग्य कार्यवाहीस.

क्र.पोअय/प्रलि/८०-सी/सुधारित वेनि-सपोनि-साळवे / 6576 /२०२१
कार्यालय पोलीस अधीक्षक, यवतमाळ.
एल. आय. सी. चौक, ता. व जि. यवतमाळ.
पिन कोड: ४४५ ००१.
Email- sp.yavatmal@mahapolice.gov.in
दिनांक : 15 JUN 2021

## आदेश

**विषय :-** सहायक पोलीस निरीक्षक पदी वेतननिश्चिती.

**संदर्भ :-** पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे आदेश क्रमांक पोमसं/४/१०/७/पोउपनि ते सपोनि पदो./१०/२०१६, दिनांक ०७.०१.२०१७

****

उपरोक्त संदर्भान्वये, पोउपनि/राजु सुखदेव साळवे, तत्कालीन नेमणूक पोस्टे.गडचांदूर, जि.चंद्रपूर यांची सहायक पोलीस निरीक्षक पदी पदोन्नतीवर अमरावती परिक्षेत्र, अमरावती येथे पदस्थापना झाल्याने ते अमरावती परिक्षेत्र येथे सहायक पोलीस निरीक्षक पदी पदोन्नतीवर दि.०१/०३/२०१७ रोजी हजर झाले. तेथून त्यांची यवतमाळ येथे नेमणूक झाल्याने ते यवतमाळ येथे दि.०५/०३/२०१७ रोजी हजर झाले.

पोउपनि/श्री.राजु साळवे हे चंद्रपूर जिल्हयात कार्यरत असतांना त्यांना, पोलीस अधीक्षक, चंद्रपूर यांचे आदेश दि.08/09/2015 अन्वये वार्षिक वेतनवाढ 02 वर्ष रोखण्याची शिक्षा (अपरिणामकारक) देण्यात आली होती. सदर शिक्षेविरुध्द त्यांनी वि.पो.म.नि.नागपूर परिक्षेत्र, नागपूर यांना केलेले अपील त्यांचे आदेश दि.24/08/16 अन्वये फेटाळण्यात आले व त्यानंतर पोलीस महासंचालक, म.राज्य, मुंबई यांचेकडे केले अपील त्यांचे आदेश दि.16/10/18 अन्वये फेटाळण्यात आले. त्यानंतर त्यांनी सदर शिक्षेविरुध्द शासनाकडे अपील केले असता, शासन गृहविभाग यांचे आदेश क्र.पीडीई-1320/प्र.क्र.176/पोल-6अ, दि.08/05/2021 अन्वये पोउपनि/राजु सुखदेव साळवे, तत्कालीन नेमणूक पोस्टे.गडचांदूर, जि.चंद्रपूर यांना दिलेली " देय असलेली पुढील वार्षिक वेतनवाढ 02 वर्षाकरिता स्थगीत (अपरिणामकारक) ही शिक्षा रद्द करुन त्याऐवजी त्यांना ताकीद देण्यात येत आहे " असे आदेश झालेले आहेत.

त्यामुळे सपोनि/राजु साळवे यांना खालील नमूद **स्तंभ-अ** प्रमाणे यापूर्वी देण्यात आलेल्या वेतनवाढीमध्ये बदल करुन **स्तंभ-ब** मध्ये नमूद केल्याप्रमाणे सुधारित वेतनवाढी मंजूर करण्यात येत आहेत.

**वेतन बॅन्ड (सहावा वेतन आयोगाप्रमाणे) : - पोलीस उप निरीक्षक :- 9300-34800 + 4300**
**सहायक पोलीस निरीक्षक :- 9300 -34800 + 4400**
**वेतन स्तर (सातव्या वेतन आयोगाप्रमाणे) : - सहायक पोलीस निरीक्षक :- 41800 - 132300 (S-15)**
**पोलीस उप निरीक्षक :- 38600 - 122800 (S-14)**

भाग-1

| स्तंभ- अ (एकस्तर पदात घेत असलेले वेतन) | | | स्तंभ-ब ( मूळ पदातील वेतन ) | | |
|---|---|---|---|---|---|
| वेतनवाढीचा दिनांक | सहायक पोलीस निरीक्षक या एकस्तर पदातले वेतन | | वेतनवाढीचा दिनांक | पोलीस उप निरीक्षक या मूळ पदातले वेतन | |
| | वेतनबॅण्ड | ग्रेड वेतन | | वेतनबॅण्ड | ग्रेड वेतन |
| 01/07/2015 | 12420 (एकस्तर पदोन्नतीतील वेतन) | 4400 | 01/07/2015 | 11930 (मूळ पदातील काल्पनिक वेतन) | 4300 |

**भाग-2**

महाराष्ट्र शासन वित्त विभाग, शासन निर्णय क्र.वेपूर-2018/प्र.क्र.44/सेवा-9, दि.01 जानेवारी-2019, महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम-2019 व शासन अधिसूचना वित्त विभाग क्र.वेपूर-2019/प्र.क्र.1/सेवा-9, दि.30 जानेवारी-2019 मधील दिलेल्या सूचनेनुसार तसेच शासन परिपत्रक क्र.वेपूर-2019/ प्र.क्र.8/सेवा-9, दि.20/02/2009 अन्वये महाराष्ट्र राज्यातील अधिकारी व कर्मचारी यांना 7 व्या वेतन आयोगानुसार सुधारित वेतन संरचना दि.01 जानेवारी 2016 पासून लागू करण्यात आली आहे. उपरोक्त नमूद शासन निर्णय/परिपत्रकात देण्यात आलेल्या सूचनांनुसार श्री.राजु साळवे यांची दि.01/01/2016 पासून सुधारित वेतन मॅट्रीक्समध्ये वेतननिश्चिती करण्यात येत आहे.

| 6 व्या वेतन आयोगातील वेतन ( एकस्तर पदोन्नतीत) | | | 7 व्या वेतन आयोगाप्रमाणे वेतननिश्चिती ( एकस्तर पदोन्नतीत) दि.01/01/2016 चे मूळ वेतन–12420+4400= 16820 16820 x 2.57=43227.4 वेतन मॅट्रीक्स (S-15/L-3) नुसार दि.01/01/2016 चे वेतन–44400 | | | 6 व्या वेतन आयोगातील वेतन (मूळ पदात) | | 7 व्या वेतन आयोगाप्रमाणे वेतननिश्चिती (मूळ पदात) दि.01/01/2016 चे मूळ वेतन–11930+4300= 16230 16230 x 2.57=41711.1 वेतन मॅट्रीक्स (S-14/L-4) नुसार दि.01/01/2016 चे वेतन–42200 | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| वेतनवाढ दिनांक | वेतन | ग्रेड वेतन | वेतन | वेतनवाढीची रक्कम | एकूण वेतन | वेतन | ग्रेड वेतन | वेतन | वेतनवाढी ची रक्कम | एकूण वेतन |
| 01/01/2016 | 12420 | 4400 | 44400 | — | 44400 | 11930 (काल्पनिक) | 4300 (काल्पनिक) | 42200 (काल्पनिक) | — | 42200 (काल्पनिक) |
| दिनांक–02/06/2016 पासून सपोनि या एक टप्पा पदोन्नतीवरून पोउपनि या मूळ पदात परत आले. | | | | | | | | | | |
| 02/06/2016 | — | — | — | — | — | 11930 | 4300 | 42200 | — | 42200 |
| 01/07/2016 | — | — | — | — | — | 12420 | 4300 | 42200 | 1300 | 43500 |
| दि.01.01.16 ते 01.06.16 पर्यंत रू.44400 प्रमाणे, दि.02.06.2016 ते 30.06.2016 पर्यंत रू.42200 प्रमाणे वेतन घेतील व दि.01.07.2016 ते 28.02.2017 पर्यंत रू.43500 प्रमाणे वेतन घेतील. | | | | | | | | | | |
| दि.01.03.2017 पासून सहायक पोलीस निरीक्षक पदी पदोन्नती झाल्याने खालीलप्रमाणे वेतननिश्चिती करण्यात येत आहे. | | | | | | | | | | |

**भाग-2**

| दिलेले वेतन | | | देय वेतन | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| वेतनवाढीचा दिनांक | वेतनबॅण्ड | ग्रेड वेतन | वेतनवाढीचा दिनांक | **पे मॅट्रीक्स/लेव्हल** | वेतनवाढ | एकूण वेतन |
| 01/03/2017 | ----- | ----- | 01/03/2017 | **43500 (पदोन्नतीपूर्वीचे वेतन)** | ---- | **43500** S-14/L-5 |
| 01/03/2017 पोउपनि ते सपोनि पदोन्नती | 12420 | 4300 | 01/03/2017 पोउपनि ते सपोनि पदोन्नती वेतन मॅट्रीक्स S-15/L-3 | 44400 | ---- | 44400 (दि.01.03.17 ते 30.06.17 पर्यंत देय) |
| 01/07/2017 | 12420 | 4300 | 01/07/2017 पदोन्नतीपूर्वीचे पदात वेतनवाढ S-14/L-6 | **43500** | 1300 | 44800 |
| | | | 01/07/2017 पदोन्नतीची वेतनवाढ S-14/L-7 | **44800** | 1300 | 46100 |
| | | | 01/07/2017 सपोनि या पदोन्नतीचे पदात निश्चित होणारे वेतन S-15/L-5 | **47100** | --- | 47100 |
| 01/07/2018 | 12420 | 4300 | 01/07/2018 | **47100** | 1400 | 48500 |
| 01/07/2019 | 12420 | 4300 | 01/07/2019 | **48500** | 1500 | 50000 |
| 01/07/2020 | 12420 | 4300 | 01/07/2020 | **50000** | 1500 | 51500 |
| **पुढील वेतनवाढीचा दिनांक 01/07/2021 राहील.** | | | | | | |

14/07/21

**( डॉ.दिलीप पाटील-भुजबळ )**
**पोलीस अधीक्षक,यवतमाळ.**

प्रति,

कक्ष-१७-वेतन लिपीक-२/कक्ष-१४-राजपत्र लिपीक

**प्रत माहितीस :** - श्री.राजु साळवे, पोस्टे.कळंब.

E:\Nitin B\Fixetion\FIXATION\API RAJU SALVE-FIXATION-21.doc2

# भाग - ५ शिक्षा/निलंबन/सेवानिवृत्ती

क्रमांकः पोअय/डिपी/कक्ष-१२/निलंबन गैरहजेरी/ 6714 /२०२१
कार्यालय पोलीस अधीक्षक, यवतमाळ.
एल. आय. सी. चौक, ता. व जि. यवतमाळ
पिन कोड :- ४४५ ००१.
Email- sp.yavatmal@mahapolice.gov.in
दिनांक :- 17 JUN 2021

## आदेश

खालील नमुद पोलीस अधिकारी/ अंमलदार व वर्ग-४ चे कर्मचारी हे निलंबित असुन त्यांचे निलंबन काळात पोलीस मुख्यालय यवतमाळ हे त्यांचे मुख्यालय निश्चीत करण्यात येवुन पोलीस अधीक्षक, यवतमाळ यांचे पुर्व परवानगी शिवाय मुख्यालय सोडु नये, तसेच निश्चीत केलेल्या मुख्यालयात नियमीत न चुकता हजेरी दयावी असे आदेशीत करण्यात आले आहे.

प्रकरणी खालील नमुद पोलीस अधिकारी/ अंमलदार व वर्ग-४ चे कर्मचारी हे त्यांचे निलंबन काळात त्यांचे नावासमोर दर्शविल्याप्रमाणे नमुद कालवधी मध्ये हजेरीवर गैरहजर मिळुन आले आहे. करीता त्यांचे नमुद कालावधीतील **निर्वाह भत्ता वरील महागाई भत्ता नामंजुर** करण्यात येत आहे.

| अ.क्र. | पोलीस अंमलदार यांचे नाव व पदानाम | नेमणुक | निलंबनात पोलीस मुख्यालय येथे हजर झाल्याचा दिनांक | माहे ०५/२०२१ मध्ये हजर असलेले दिवस | माहे ०५/२०२१ मधील गैरहजर दिवस |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | पोउपनि/राजाभाऊ घोगरे | पोलीस मुख्यालय यवतमाळ | ११/०१/२०२१ | ३१ | ०० |
| ०२ | पोहवा/१६७९ सुभाष राठोड | पोलीस मुख्यालय यवतमाळ | १५/०६/२०२० | ०० | ३१ |
| ०३ | पोशि/२६३६ शेख मुनिर | पोलीस मुख्यालय यवतमाळ | १५/०६/२०२० | ०० | ३१ |
| ०४ | पोहवा/१३४४ श्याम राठोड | पोलीस मुख्यालय यवतमाळ | ०४/१०/२०२० | ०१ | ३० |
| ०५ | पोहवा/२६ प्रेम राठोड | पोलीस मुख्यालय यवतमाळ | १०/१०/२०२० | ०० | ३१ |
| ०६ | पोशि/२३३९ गिरीष मडावी | पोलीस मुख्यालय यवतमाळ | १०/१०/२०२० | ३० | ०१ |
| ०७ | नापोशि/४२ प्रशांत थुल | पोलीस मुख्यालय यवतमाळ | २०/१०/२०२० | ०० | ३१ |
| ०८ | पोहवा/१८१९ प्रभाकर काळे | पोलीस मुख्यालय यवतमाळ | २८/०१/२०२१ | ०० | ३१ |
| ०९ | पोशि/३७४ तुषार अंबाडरे | पोलीस मुख्यालय यवतमाळ | ०८/०२/२०२१ | १३ | १८ |
| १० | वार्ड आया/बिल्कीस बानो | पोलीस मुख्यालय यवतमाळ | २९/०५/२०२१ | ०२ | ०० |

16/6/21

**(डॉ. दिलीप पाटील-भुजबळ)**
पोलीस अधीक्षक, यवतमाळ.

**प्रति,**

**उपरोक्त निलंबीत पोलीस अधिकारी व अंमलदार.**
सर्व नेमणुक पोलीस मुख्यालय यवतमाळ.

**मार्फत** :- राखीव पोलीस निरीक्षक, पोलीस मुख्यालय यवतमाळ.

**प्रत :- कक्ष-१८/कक्ष-१०/कक्ष-०९,/कक्ष-१४/कक्ष-१७/कक्ष-११/पोउपअधि(मुख्या) यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीस.**

क्रमांक :पोअय/कक्ष- १२(२)/ अपील आ.ता./पो.नि.वडगांवकर/ 6702 /२
कार्यालय पोलीस अधीक्षक, यवतमाळ.
एल. आय. सी. चौक, ता. व जि. यवतमाळ.
पिन कोडः ४४५ ००१.
Email- sp.yavatmal@mahapolice.gov.in
दिनांक :- 17 JUN 2021

संदर्भ :- पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे क्र.पोमसं/११/२२/६-अपिल-वडगांवकर/९७/२०२०, दि.०३/०६/२०२१

विषयः- अपील आदेश तामील करणे बाबत.
पो.नि.दिलीप वडगांकवर, नेमणुक पो.स्टे.बाभुळगांव

---ooo---

उपरोक्त संदर्भाकीत विषयान्वये पो.नि.दिलीप वडगांकवर, नेमणुक पो.स्टे.बाभुळगांव यांना ते पो.स्टे. मारेगांव येथे कार्यरत असतांना कर्तव्यात केलेल्या कसुरीचे अनुषंगाने विशेष पोलीस महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र, अमरावती यांचे आदेश क्रमांक अप/कक्ष-५/यवतमाळ/पोनि-वडगांवकर/कसुरी/प्र.क्र.४२/अं.आ./२०२०/१५२६, दि.१९/०३/२०२० अन्वये देण्यात आलेली **"पुढिल देय वार्षीक वेतनवाढ एक (०१) वर्षाकरीता रोखणे "** **(अपरिणामकारक)** या शिक्षेविरुध्द पोलीस महासंचालक यांना दि.२८/०५/२०२० रोजी सादर केलेल्या अपील अर्जाचे अनुषंगाने पो.नि.दिलीप वडगांवकर यांना दि.१९/०३/२०२० रोजी विशेष पोलीस महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र, अमरावती यांनी दिलेली शिक्षा कमी करुन **त्याऐवजी त्यांना " सक्त ताकीद " ही शिक्षा देण्यात आले असल्याबाबतचा अपील आदेश कार्यालयास प्राप्त झाला आहे.**

संदर्भीय नमुद अपील आदेशाच्या ०२ प्रती सोबत पाठविण्यात येत आहे. मुळ अपील आदेश प्रत पो.नि.दिलीप वडगांकवर, नेमणुक पो.स्टे.बाभुळगांव यांना अदा करुन दुय्यम प्रतिवर त्यांची दिनांकीत स्वाक्षरी घेवुन प्रत उलटटपाली कार्यालयास सादर करावी.

16/06/21

(डॉ.दिलीप पाटील- भुजबळ)
पोलीस अधिक्षक,यवतमाळ

प्रति,

उपविभागीय पोलीस अधिकारी, यवतमाळ

प्रत,

अधिकारी आस्थापना (कक्ष-१०)/ डिपीजी लिपीक / अधिकारी- वेतन लिपीक यांना माहीती व आवश्यक

अतितात्काळ "मुख्य प्रत" 6702

क्र.पोमसं/११/२२/६-अपिल-वडगांवकर/९७/२०२०
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय,
शहिद भगतसिंग मार्ग, कुलाबा,
मुंबई, ४०० ००१.
दिनांक :-०३/०६/२०२१

२

**संदर्भ :-** १. विशेष पोलीस महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र यांचे क्र.अप/कक्ष-५/यवतमाळ/ पोनि-वडगांवकर/कसुरी/प्र.क्र.४२/अं.आ./२०२०/१५२६, दि.१९/०३/२०२० चे अंतिम आदेश.
२. पोलीस निरीक्षक दिलीप शंकरराव वडगांवकर, सध्या नेम. यवतमाळ जिल्हा पोलीस दल यांचा दि.२८/०५/२०२० चा अपिल अर्ज.

**-: अपिल आदेश :-**

पोलीस निरीक्षक दिलीप शंकरराव वडगांवकर हे यवतमाळ येथील मारेगांव पोलीस ठाणे येथे प्रभारी अधिकारी म्हणून नेमणुकीस असतांना, त्यांनी खालील प्रमाणे कसुरी केली आहे :-

**कसुरी:-**

पोनि. दिलीप शंकरराव वडगांवकर यांनी पोलीस नियमावली भाग-३ मधील २१२ मध्ये नियम क्रमांक १२ अन्वये मृतक नामे रुपा विनोद जुनघरी यांची मर्गची चौकशी केल्यावर, या प्रकरणात घटना घडण्याच्या दिवशीच तात्काळ भा.दं.वि. कलम ३०२, ३०७ अन्वये मृतक नामे रुपा विनोद जुनघरी यांचेवर गुन्हा दाखल करुन, तपास करणे क्रमप्राप्त होते. तथापि, नमूद प्रकरणात दि.११/१२/२०१८ रोजी केवळ मर्ग क्र.६१/२०१८ कलम १७४ सी.आ.पी.सी. दाखल करण्यात आलेला आहे.

पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी म्हणून पोलीस ठाणेला दाखल असलेले गुन्हे / मर्ग योग्य प्रकारे दाखल होतात की नाही, योग्य कलम लावण्यात येते की, नाही, याची जबाबदारी प्रभारी अधिकारी म्हणून ठाणेदार यांचेवर असते. परंतु पोनि. दिलीप शंकरराव वडगांवकर यांनी मर्ग क्र.६१/२०१८ कलम १७४ जा.फौ. चा दाखल असतांना व सदर मर्गमध्ये २ मृतक असतांना सुध्दा, मर्ग दाखल केलेला दि.११/१२/२०१८ ते ११/०५/२०१९ पावेतो मर्ग चौकशी अंमलदार यांची दप्तर तपासणी न घेता, मर्ग मध्ये कोणतेही मार्गदर्शन केलेले दिसून येत नाही. सदर मर्ग चौकशीमध्ये प्रथमदर्शी साक्षीदार यास पडताळले नाही. घटनास्थळी भेट दिल्याचे दिसून आले नाही. मृतकाचे पोस्ट मार्टन अहवाल तपासल्याचे दिसून आले नाही. दुर्घटनेतुन बचावलेली कु.आरोही जुनघरी हिचे उपचाराबाबतचे कागदपत्रे पडताळले नाही. मृतक हिला घरगुती काही त्रास होता काय? किंवा कोणता वाद होता काय ? याबाबत तपासी अंमलदाराकडून माहिती घेतलेली नाही. पर्यायाने सदर चा मर्ग तब्बल १५१ दिवस विनाकारण प्रलंबित ठेवला. पोनि. दिलीप शंकरराव वडगांवकर यांनी मर्ग चौकशीमध्ये तपासी अंमलदारकडून किंवा स्वत:कोणतीही माहिती घेतलेली नाही. यावरुन ते पोलीस ठाणेच्या कामकाजामध्ये लक्ष पुरवित नसल्याचे दिसून येते. त्यांच्या या निष्काळजीपणामुळे अप क्र.१६०/२०१९ कलम ३०२, ३०७ भा.दं.वि. हा पर्यायाने उशिरा दाखल करण्यात आला.

अशाप्रकारे पोनि.दिलीप शंकरराव वडगांवकर यांनी कर्तवयात अत्यंत निष्काळजीपणा व बेजबाबदारपणा केल्याचे दिसून येते.

२. उपरोक्त कसुरीच्या अनुषंगाने विशेष पोलीस महानिरीक्षक, अमरावती परि. यांनी त्यांचा क्र.अप/कक्ष-५/यवतमाळ/पोनि-वडगांवकर/४२/कसुरी/२०१९/४३५३, दि.१४/१०/२०१९ अन्वये पोनि.दिलीप शंकरराव वडगांवकर यांना **"पुढील देय वार्षिक वेतनवाढ ०१ (एक) वर्षाकरिता (अपरिणामकारक) रोखण्याची "** शिक्षा का करण्यात येऊ नये अशी कारणे दाखवा नोटीस दिली होती. सदरहु नोटीसला पोनि.दिलीप शंकरराव वडगांवकर यांनी सादर केलेल्या खुलाश्यात बचावार्थ सांगण्यासारखे काहीही दिसून आले नसल्याने, अपचारी यांनी केलेल्या कसुरीच्या तुलनेत प्रस्तावीत केलेली शिक्षा विशेष पोलीस महानिरीक्षक, अमरावती परि. यांनी त्यांचा क्र.अप/कक्ष-५/यवतमाळ/पोनि-वडगांवकर/कसुरी/प्र.क्र.४२/अं.आ./२०२०/१५२६, दि.१९/०३/२०२० च्या अंतिम आदेशान्वये कायम केली आहे.

३. सदर शिक्षेच्या आदेशाविरुध्द पोनि.दिलीप शंकरराव वडगांवकर यांनी दि.२८/०५/२०२० अन्वये या कार्यालयास विहीत मुदतीत अपील अर्ज सादर केला आहे. सदरहु अपील अर्जामध्ये त्यांनी पुढील प्रमाणे काही मुद्दे उपस्थित केलेले आहेत:-

"मी पोलीस ठाणे मारेगांव, जि. यवतमाळ येथे ठाणेदार म्हणून नेमणुकीस असतांना पोलीस ठाणेचे हद्दीतील

खेड्यात एका महिलेने तिचे मुलासह विहीरीत उडी घेवून आत्महत्या केली. सदर प्रकरणी पोलीस ठाणेला अ.क.मु.क्र. ६१/२०१८ क्र.१७४ जाफौ. प्रमाणे तपासात होते. सदरचा तपास पोलीस ठाणेमधील पोहवा. यांचेकडे होता. तपासी अंमलदार यांनी सदर घटनेच्या संबंधाने गावातील साक्षिदार यांचे म्हणणे आम्हास कळविले नाही किंवा प्रलंबित प्रकरणांचे दप्तर निरीक्षण करवुन घेतले नाही. नंतर सदर प्रकरणात मृतक महिलेने तिचे मुलासह विहीरीत उडी घेवून आत्महत्या केल्या प्रकरणी अप क्र.१६०/१९ कलम ३०२, ३०७ भादंवि. प्रमाणे गुन्हा नोंद करवून तपास आम्ही स्वत: केला. तपासाअंती मयत आरोपीविरुध्द ॲबे. समरी रवाना करण्यात आली. एकंदरीत सदर प्रकरणी आमचेकडून कामकाजात कोणतीही चुक किंवा हलगर्जीपणा झाला नाही. त्याचप्रमाणे पोलीस ठाणे मारेगांव येथे ठाणेदार म्हणून नेमणुकीस असतांना आमचेकडे पोलीस ठाणे **वणी** येथील ठाणेदार पदाचा तात्पुरता प्रभार सुध्दा देण्यात आला होता. सदर दोन्ही अ वर्ग पोलीस ठाणेचे कामात व्यस्त असल्याने व तपासी अंमलदार यांनी आमचेकडून प्रलंबित तपासणी करवून न घेतल्याने विलंबाने गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

आमची आतापावेतो सेवा चांगल्या प्रकारे झाली आजपावेतो कोणतीही शिक्षा झालेली नाही, तरी सेवेशी नम्र विनंती आहे की, उपरोक्त दिलेली ०१ वर्ष वेतनवाढ रोखण्याबाबतची शिक्षा आमचे सेवेचा विचार करुन माफ करणेबाबत विनंती आहे.”

४. एकंदरीत प्रस्तुत प्रकरणातील चौकशीच्या कागदपत्रांचे, विशेष पोलीस महानिरीक्षक, अमरावती परि. यांच्या निराकरण टिप्पणीचे आणि पोनि.दिलीप शंकरराव वडगांवकर यांनी अपिल अर्जात उपस्थित केलेल्या मुद्दांचे अवलोकन केले असता, त्यांचेवर ठेवण्यात आलेला दोषारोप सिध्द झालेला आहे. तसेच मर्ग पुर्वीच दाखल झालेला असल्याने, आणि घटनास्थळी इन्कवेस्ट पंचनामा वगैरे झालेला असल्याने, जरी गुन्हा नोंद करण्यास विलंब झाला आहे, तरी त्यामुळे तपासामध्ये कोणताही फरक पडलेला दिसून येत नाही, या कारणांमुळे पोनि.वडगांवकर यांना संदर्भ क्र.१ अन्वये देण्यात आलेल्या शिक्षेत सौम्यता आणल्यास ते निश्चितच न्यायोचित होईल, असे **'सक्षम प्राधिकारी'** म्हणून माझे मत झाले आहे. म्हणून मी पुढीलप्रमाणे आदेश देत आहे :-

**-: आदेश :-**

मी, संजीव कुमार सिंघल, अपर पोलीस महासंचालक (प्रशासन), महाराष्ट्र राज्य, मुंबई, याद्वारे अपिलार्थी पोनि.दिलीप शंकरराव वडगांवकर यांना संदर्भ क्र.१ अन्वये दिलेली शिक्षा ही कसुरीच्या मानाने जास्त वाटत असल्याने, ती कमी करुन, त्याऐवजी त्यांना **"सक्त ताकिद"** ही शिक्षा देण्यात येत आहे.

२. महाराष्ट्र पोलीस (शिक्षा व अपीले) १९५६, मधील नियम ७ नुसार सदर शिक्षेविरुध्द फेर अपील अनुज्ञेय नाही.

(संजीव कुमार सिंघल )
अपर पोलीस महासंचालक (प्रशासन)
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रति,

पोनि.दिलीप शंकरराव वडगांवकर, सध्या नेम. यवतमाळ.

**मार्फत :- पोलीस अधीक्षक, यवतमाळ.**

**क्रमांक :पोअय/कक्ष-१२(२)/अं.आ/सपोनि-निराळे+२/6703/२१**
**कार्यालय पोलीस अधीक्षक, यवतमाळ.**
**एल. आय. सी. चौक, ता. व जि. यवतमाळ.**
**पिन कोडः ४४५ ००१.**
Email- sp.yavatmal@mahapolice.gov.in
**दिनांक :-** 17 JUN 2021

**अंतीम आदेश**

**संदर्भ :-** १) का.दा.नो. क्र :- पोअय/ डिपी/कक्ष-१२(२)/का.दा.नो./सपोनि-निराळे+२/१४०४/२०२१, दि.१८/०२/२०२१

**थोडक्यात कसुरी :-** अवैद्य धंदे करणा-यांना अभय देवुन अवैद्य धंदे पुर्ववत सुरू ठेवल्याचे कसुरी प्रकरणी

**कसुरदाराचे नाव :-** १) सपोनि- स्वप्नील निराळे, २) पोहवा/८६३ नरेंद्र लावरे, ३) नापोशि-१००१ सचिन तंबाखे सर्व नेमणुक पो.स्टे.नेर

---ooo---

**कसुरी**

तुम्ही **१) सपोनि स्वप्नील निराळे, २) पोहवा/८६३ नरेंद्र लावरे, ३) नापोशि-१००१ सचिन तंबाखे, सर्व नेमणुक पो.स्टे. नेर** तुम्हाला उपविभागीय पोलीस अधिकारी, दारव्हा यांनी वारंवार अवैद्य धंद्यावर आळा घालण्यासाठी पो.स्टे.लाडखेड हद्यीतील संपुर्ण अवैद्य धंदे यांचेवर प्रभावीपणे कार्यवाही करुन संपुर्ण अवैद्य धंदे बंद करणेबाबत गुन्हे सभेमध्ये व पत्राव्दारे सुचना व त्यासबंधी पत्र व्यवहार करुन सुध्दा तुम्ही वरिष्ठांचे आदेशाचे पालन न करता हेतुपुरस्कर दुर्लक्ष करुण जाणीवपुर्वक स्वतःचे आर्थिक फायद्याकरिता अवैद्य धंदे करणा-यांना अभय देवुन अवैध धंदे पुर्ववर सुरू ठेवले.

